७७५
३२१

# महाराष्ट्र शासन

संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य.
कोकण भवन,सहावा मजला,नवी मुंबई ४०० ६१४
☎-०२२/२७५७१३११.
E.Mail:- calfak6@yahoo.com
Fax:- ०२२/२७५६३८२४.

**कार्यालयीन आदेश क्रमांक २३अ दिनांक** 21 APR 2011

विषय :- लेखापरीक्षण कार्यपध्दती.

संदर्भ :- कार्यालयीन आदेश क्र.२२ दिनांक १९.४.२०११

उपरोक्त संदर्भांकित आदेशान्वये लेखापरीक्षण कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे. त्यानुसार जिल्हयात उपलब्ध असणाऱ्या सहाय्यक लेखापरीक्षा अधिकारी, वरिष्ठ लेखापरीक्षक व कनिष्ठ लेखापरीक्षक यांच्या सेवा सर्व संस्थाच्या लेखापरीक्षणाकरिता उपयोगात आणावयाच्या आहेत. जिल्हयात ग्रामपंचायतीची संख्या जास्त असल्याने सहाय्यक लेखापरीक्षा अधिकारी व वरिष्ठ लेखापरीक्षक हे पुरेसे प्रमाणात उपलब्ध नसल्यास ग्रामपंचायतीच्या लेखापरीक्षणासाठी कनिष्ठ लेखापरीक्षक यांना पथक प्रमुख करण्यास हरकत नाही. परंतु ग्रामपंचायत लेखापरीक्षणासाठी कनिष्ठ लेखापरीक्षक यांचे जे पथक गठीत करण्यात येईल त्या पथकाचे प्रमुख म्हणून वरिष्ठतम कनिष्ठ लेखापरीक्षकाला नेमण्यात यावे.

अशाप्रकारे पथकांची संख्या निश्चित केल्यानंतर या पथकांना ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षणाचे काम देताना उतरत्या क्रमाने उत्पन्न लक्षात घेऊन तयार करण्यात आलेल्या यादीमधून ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षणाचे काम सर्व पथकाना योग्यपणे देण्यात यावे. याबाबत खालील उदाहरणावरुन ही बाब आणखी स्पष्ट होईल.

समजा एखाद्या जिल्हा कार्यालयात ग्राम पंचायतीच्या लेखापरीक्षणाची ५ पथके उपलब्ध असून जिल्हयातील एकूण ग्रामपंचायतीची संख्या ५० असल्यास त्या पथकांना तयार करण्यात आलेल्या यादीतील खालील क्रमाने ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षणाचे काम देण्यात यावे.

| अ.क्र. | पथक क्रमांक | उत्पन्नाच्या उतरत्या क्रमाने लेखापरीक्षणाकरिता द्यावयाची ग्रामपंचायत (यादी क्रमांक) |
|---|---|---|
| १. | १ | १ - १० - १५ - २० - २५ - ३० - ३५ - ४० - ४५ - ५० |
| २ | २ | २ - ९ - १४ - १९ - २४ - २९ - ३४ - ३९ - ४४ - ४९ |
| ३. | ३ | ३ - ८ - १३ - १८ - २३ - २८ - ३३ - ३८ - ४३ - ४८ |
| ४. | ४ | ४ - ७ - १२ - १७ - २२ - २७ - ३२ - ३७ - ४२ - ४७ |
| ५. | ५ | ५ - ६ - ११ - १६ - २१ - २६ - ३१ - ३६ - ४१ - ४६ |

वरील प्रमाणे कार्यवाही संबंधित जिल्हयाच्या सहाय्यक संचालक यांनी करावी.

(के.एम.विधाते)
संचालक
स्थानिक निधी लेखासंचालनालय,
महाराष्ट्र राज्य,
नवी मुंबई.

प्रत

१. सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा,मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

२.सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, सर्व.